**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक-रानिआ/मनपा-२००८/प्र.क. ९/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ११ नोव्हेंबर, २००८.

**आ दे श**

सर्वोच्च न्यायालयाने दिनांक- ६ डिसेंबर, २००७ रोजी दिवाणी अर्ज क्रमांक-५६५९/२००७ यामध्ये दिलेल्या निर्णयास अनुसरुन राज्य निवडणूक आयोग असे आदेश काढीत आहे की, --

सर्वसाधारणपणे राज्य निवडणूक आयोगातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या सार्वत्रिक अथवा पोटनिवडणुकीतील मतदान रविवारीच घेण्यात येते. काही प्रसंगी निवडणुकीतील मतदान रविवारी आयोजित करता येणे शक्य नसते, त्यावेळी त्या निवडणुकीतील मतदान रविवारशिवाय अन्य दिवशी घेण्यात येते. अशावेळी तो दिवस संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात सुट्टीचा दिवस म्हणून घोषित करण्यात येतो. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार शाळेतील व महाविद्यालयातील शैक्षणिक कार्यात असलेल्या कर्मचारीवर्गाला निवडणुकीसंबंधी काम देताना ते काम सुट्टीचा दिवस किंवा ज्या दिवशी शैक्षणिक काम नसते अशा दिवशी देण्यात यावे.

ज्या दिवशी मतदान अधिकारी/कर्मचारी सर्व मतदान साहित्य घेऊन मतदान केंद्राचा ताबा घेतात त्या दिवशी संबंधित स्थानिक स्वराजय संस्थेच्या हद्दीतील शाळांना सुट्टी असणे आवश्यक आहे. तसेच मतदानाच्या दिवशीसुध्दा शाळांना सुट्टी राहील, याची खात्री करण्यात यावी. तसेच शिक्षकांची ज्यावेळी मतदान अधिकारी म्हणून

नेमणूक करण्यात येते त्यावेळी त्यांच्यासाठी आयोजित करण्यात येणारे प्रशिक्षण हेसुध्दा सुट्टीच्या दिवशीच घेण्यात यावे.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

र.वि.नातू

( रचना नातू )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,
१) सर्व महानगरपालिका आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी
३) सर्व तहसिलदार
४) सर्व नगर परिषदा/ नगर पंचायतींचे मुख्याधिकारी

प्रत:-
१) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६) सर्व विभागीय आयुक्त